राज्यातील नगरपरिषदांसाठी लागू असलेल्या “वैशिष्ट्यपूर्ण” योजनेचे निकष व सुधारित मार्गदर्शक तत्वे निश्चित करणेबाबत.

(वित्तीय आकृतीबंधामध्ये सुधारणा)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-धोरण-२०१७/प्र.क्र. १७१/नवि-१६ (ई- १४८८५३९)**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- १६ एप्रिल, २०२६**

**संदर्भ :-**

(१) नगर विकास, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/ प्र.क्र.१७१/ नवि-१६, दि. १७ नोव्हेंबर, २०१७

(२) नगर विकास, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/ प्र.क्र.१७१/ नवि-१६, दि. ३० सप्टेबर, २०२०

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष, मार्गदर्शक तत्वे तसेच वित्तीय आकृतीबंध संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयांन्वये निश्चित करण्यात आले आहेत. सदर योजनेच्या वित्तीय आकृतीबंधामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील नगरपरिषदांना “वैशिष्ट्यपूर्ण” कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. (८) मध्ये योजनेचा वित्तीय आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून नगरपरिषद क्षेत्राकरीता राज्य शासन ९० % व नगरपरिषद १० % असा राहिल असे नमूद आहे.

२. सदर योजनेच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ८ मधील वित्तीय आकृतीबंधामध्ये सुधारणाकरुन या योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या निधीकरीता १०० % राज्य शासन हिस्सा करण्यात येत आहे.

३. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०४१६१५५७१८७२२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.04.16 16:00:15 +05'30'

**(सचिन द. सहस्त्रबुद्धे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.मुख्यमंत्री महोदयाचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई.
९. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई.
१०. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
१३. अ.मु.स. (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
१६. विभागीय आयुक्त, सर्व.
१७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन, सातवा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
१८. जिल्हाधिकारी, सर्व.
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२२. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई - ४०० ६१४.
२३. सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई - ४०० ६१४.
२४. जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व
२५. मुख्याधिकारी, सर्व
२६. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
२७. कार्यासन (नवि-४), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.